BDC LIBRARY

New Paper Clipping

A.Y. 2024-2025

# कु. प्रतीक्षा भोई हिची जिल्हा न्यायालयात लिपिकपदी निवड



**पाटण, दि. २७ :** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग अंतर्गत घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरती प्रक्रियेत पाटण येथील कु. प्रतीक्षा प्रकाश भोई हिची सातारा जिल्हा न्यायालयात लिपिकपदी नुकतीच निवड झाली आहे. याबद्दल तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

वडील प्रकाश भोई यांनी अत्यंत खडतर परिस्थितीत प्रतीक्षा हिचे शिक्षण पूर्ण केले. तिचे प्राथमिक शिक्षण कन्या विद्या मंदिर, घुणकी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, माध्यमिक शिक्षण कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल, पाटण व महाविद्यालयीन शिक्षण, पाटण येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात पूर्ण झाले. जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर अत्यंत कष्टाने प्रतीक्षा हिने यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिचे पाटण तालुका भोई समाज संघाच्यावतीने अभिनंदन करून व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.